आवक - ८२३/९६
२८।६।९६.

10

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, शिवाजीनगर, पुणे
जा.क्र. मनपा/शिक्षण/साप्रा.शा./तु.मा./ ~~९१९~~ ९११
दिनांक - २४।६

शाळा प्रमुख,
समता बालक मंदिर, ...........
समतानगर गृहरचना महासंघ, येरवडा यांस -
पुणे - ४११००६

विषय : मान्य खाजगी प्राथमिक शाळांना नविन तुकड्या उघडण्यास मान्यता देणेबाबत

संदर्भ : मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचेकडील पत्र जा.क्र. - प्रा/प्राशि/जा.तु./पी.आर./ ५६१७ दि. ४।६।९६

संदर्भांकित पत्रान्वये कळविल्याप्रमाणे जादा तुकड्यांच्या प्रस्तावाची मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांनी छाननी केली असता तुमचे शाळेतील खालील दर्शविलेल्या — इयत्तांच्या जादा तुकडीस/नैसर्गिक वाढीच्या वर्गास जून, १९९५-९६ पासून परवानगी देण्यात येत आहे.

| शाळेचे नाव | इयत्ता | जादा तुकडी/ नैसर्गिक वाढ | शेरा |
|---|---|---|---|
| समतानगर बालक मंदिर | इ. ५ वी | २ री तुकडी | मंजूर |
| | इ. ६ वी | २ तुकड्या | मंजूर |
| | इ. ७ वी | १ तुकडी | मंजूर |

(१) वरील जादा तुकड्यांची चालू वर्षाच्या अंदाजपत्रकात तरतूद करण्याची व्यवस्था करावी
(२) सदर वर्गाकडून सरासरी हजेरीची अट पूर्ण झाली पाहिजे.
(३) जादा वर्गास शिक्षक नेमताना विहित वयोमर्यादेतील व प्रशिक्षित (डी.एड.) व रोस्टर क्रमाप्रमाणे शिक्षक नेमावा.

कळावे, दिनांक - १८।६।९६

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

जा. क्र. प्रा./प्रा. शि./जा. तु./पीआर
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे
यांचे कार्यालय.

दिनांक – २१/१२/९४

प्रति,

मुख्याध्यापक/ ~~मुख्याध्यापिका~~,
समता बालक मंदीर व शिक्षण संस्था
महाराष्ट्र हौउसिंग कॉलनी स.नं. १९१ अ, समतानगर येरवडा पुणे ६

विषय : – सन १९९४–९५ या व त्यापुढील शैक्षणिक वर्षासाठी अनुदानित प्राथमिक शाळांतील शिक्षक संख्या व इयत्तानिहाय तुकडया मान्यता....

वरील विषयासंदर्भात कळविण्यात येते की, आपल्या शाळेची सन १९९४–९५ या शैक्षणिक वर्षातील दिनांक ३० सप्टेंबर १९९४ ची इयत्ता निहाय विद्यार्थी पटसंख्या व उपस्थिती आणि प्रशासन अधिकारी/शिक्षण अधिकारी यांनी मंजूर केलेल्या शिक्षक पदांची संख्या या दोन बाबी विचारात घेऊन आपल्या शाळेस सन १९९४–९५ या शैक्षणिक वर्षासाठी अनुदान तत्वावर खालील प्रमाणे इयत्तानिहाय तुकडयांना मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार इयत्तानिहाय व तुकडीनिहाय अध्यापन कार्य होणे आवश्यक आहे. शाळेत मान्य तुकडयापेक्षा कमी संख्येने तुकडया आढळून आल्यास कमी असणा–या तुकडयाच्या संख्येइतक्या शिक्षकांची मान्यता काढून घेतली जाईल.

| इयत्ता | विद्यार्थी पटसंख्या | उपस्थिती | मंजूर तुकडयांची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ ली | १२७ | १२० | २ | |
| २ री | १३२ | १३० | ३ | |
| ३ री | १२० | ११९ | २ | |
| ४ थी | १०८ | १०३ | २ | |
| ५ वी | १०२ | १०२ | २ | |
| ६ वी | ०६९ | ०६९ | २ | |
| ७ वी | ०४७ | ०४७ | १ | |
| एकूण | ७०१ | ६९० | १४ | |

वरील प्रमाणे इयत्ता निहाय विद्यार्थी पटसंख्या/उपस्थिती व तुकडयांची संख्या यानुसार आपल्या शाळेस सन १९९४–९५ या शैक्षणिक वर्षासाठी खालीलप्रमाणे शिक्षक पदांना मान्यता देण्यात येत आहे.

| अ.नं. | पदाचे नांव | | मंजूर संख्या |
|---|---|---|---|
| १. | वरिष्ठ मुख्याध्यापक – | १ | १ |
| २. | सहा. शिक्षक – | १३ | १३ |
| ३. | पदवीधर शिक्षक – | १ | १ |
| | एकूण मान्य शिक्षक संख्या – | | १५ |

...२/-

मुख्याध्यापकात प्रत्येक आठवड्यात किमान १२ तासिकाचे प्रत्यक्ष अध्यापन व १२ तासिकाचे पाठनिरीक्षण अनिवार्य राहील.

आपल्या शाळेसाठी वर नमूद केल्याप्रमाणे सर्ववर्गाच्या मिळून एकूण ...१४. तुकड्या व १५.(पंधरा) शिक्षक संख्या मंजूर केली असून यापुढे यावर्षी अगर त्यापुढील कोणत्याही वर्षी जादा तुकडी अगर जादा शिक्षकास मंजुरी दिली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. पुढील अगर त्यानंतरच्या एखादयावर्षी इ. २ ते ७ वी पर्यंतच्या एखाद्या वर्गास नैसर्गिकवाढीमुळे जादा तुकडीची आवश्यकता भासत असेल तर इ. १ ली अगर अन्य वर्गाच्या मंजूर तुकड्यातील तुकडी कमी करुन शाळांतर्गत समायोजनाने संबंधित वर्गास तुकडी उपलब्ध करुन देता येईल. त्याबाबतचा आवश्यक तसा प्रस्ताव शिक्षणाधिकारी [प्राथमिक]/ प्रशासन अधिकारी यांचेकडे सादर करुन त्यास मान्यता घ्यावी.

१.५ कि.मी. अंतरात अन्य कोणतीही प्राथ. शाळा [जि. प. अगर खाजगी] नसेल तर मात्र पटसंख्या वाढीमुळे जादा तुकडी आवश्यक असेल तर प्रशासन अधिकारी/ शिक्षण अधिकारी [प्राथ] यांचेमार्फत मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करता येईल. तथापि पूर्व मंजुरीशिवाय कोणत्याही परिस्थितीत नवीन तुकडी सुरु करु नये अगर त्यावर शिक्षकाची नेमणूक करु नये. तसेच शाळेने आपल्या अधिकारात इ. १ ली च्या प्रत्येक तुकडीत ५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ नयेत. शिक्षणाधिकारी [प्राथ] अगर प्रशासन अधिकारी यांचे पूर्व मंजूरीने ही संख्या ६० पर्यंत वाढविता येईल.

वरील सूचनांचे आपण काटेकोरपणे पालन करावे. अन्यथा अनुदान कपात अगर शाळेची मान्यता काढून घेणे अशी कारवाई खात्याकडून केली जाईल याची नोंद घ्यावी.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे - १.

प्रत - शिक्षण अधिकारी [प्राथ], जिल्हा परिषद, ............./प्रशासनअधिकारी म.न.पा./न.पा. शि. मं. ...पुणे...-६ यांना देऊन त्यांना सूचना देण्यात येत की, सदर शाळा वरील प्रमाणे सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करेल या दृष्टीने आवश्यक तो कार्यवाही करावी. यापुढील कोणत्याही वर्गाची पटसंख्या ६० पेक्षा अधिक होणार नाही याची दक्षता घेऊन प्रवेश नियंत्रित करावेत. तसेच वरील प्रमाणे एकूण मंजूर तुकड्यापेक्षा जादा तुकड्या सुरु केल्या जाणार नाहीत हे पहावे.

———— xxxxxxx ————

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे
जा. क्र. मनपा/शिक्षण/प्राथ/ /४९/
दिनांक - २८-४-९२

शाळा प्रमुख,
संगीता नगर, ओलेक्शारक महारोगाचे
संगीतानगर बालक मंदिर येरवडा पुणे ६ यांस -

विषय - शाळा मान्यतेबाबत.

संदर्भ - मा. शि. मं. ठ. क्र. २२५ दिनांक - १०।५।९१.

मा. शिक्षण मंडळ ठराव क्रमांक - २२५ दिनांक - १०।५।९१ व शिक्षण मंडळाने केलेल्या पाहणीवरुन तुमचे शाळेस फक्त सन १९९१-९२ या शाळेय वर्षाकरिता विनाअनुदान तत्वावर पाहणी अहवालातील खालील दर्शविलेल्या त्रुटींची पूर्तता व मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ मधील नियमांची पूर्तता करण्याच्या अटीवर सन १९९१-९२ या शैक्षणिक वर्षासि खालील प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासिह मान्यता देण्यात येत आहे. खालील त्रुटींची पूर्तता विहित मुदतीत न केल्यास शाळेची मान्यता पुढे चालू ठेवणे शक्य होणार नाही, याची नोंद घ्यावी.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| इयत्ता तीन १ली तुकड्या | इयत्ता तीन २री तुकड्या | इयत्ता तीन ३री तुकडी | इयत्ता दोन ४थी तुकड्या | इयत्ता एक ५ वी तुकडी | इयत्ता — ६ वी — | इयत्ता — ७ वी — |

(१) विना अनुदान खाजगी प्राथमिक शाळांना वर्ग फी रु. १५/- (पंधरा) शासनाचे नियमप्रमाणे फी घेता येईल. तुमचे शाळेत वर्ग फी रु. १५/- पेक्षा जास्त फी घेण्यात येते.

(२) शाळेत नेमण्यात आलेले शिक्षक प्राथमिक शाळांसाठी अप्रशिक्षित (बी.ए.बी.एड.) आहेत.

(३) शाळेत नेमण्यात आलेले शिक्षक विहित वयोमर्यादेपेक्षा जादा वयाचे आहेत.
इ. २री व ३री च्या

(४) शाळेतील ~~काही~~ वर्गातील विद्यार्थी संख्या शहरी भागाचे मानाने कमी आहे.

(५) शाळेची इमारत शाळेसाठी योग्य नाही.

(६) मागासवर्गीय शिक्षक नेमणे आवश्यक आहे.

(७) शासकीय वेतनश्रेणीप्रमाणे शिक्षकांना वेतन व भत्ते देण्यात येत नाहीत. ते शासकीय वेतनश्रेणीप्रमाणे देण्यात यावेत.

(८) शाळेस क्रीडांगण नाही.

वरील त्रुटींची पूर्तता दिलेल्या मुदतीत (३१।५।९२) न केल्यास पुढील वर्षी शाळेची मान्यता दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे, दिनांक - २३।४।९२

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

जा.क्र.प्रा/प्राशा/मान्यता/पीआर/
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय.
दिनांक- १६/१०/१९८९

3

प्रति,

शिक्षणाधिकारी [प्राथमिक विभाग,]
जिल्हा परिषद, पुणे.

विषय:- सन १९८९ - ९० या शैक्षणिक वर्षात नवीन खाजगी प्राथ.शाळांना परवानगी देणे बाबत.

संदर्भ:- शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्र.व्हीएलएस १०८९/८६६५/प्राशि-3 दिनांक-५/१०/८९- चे पत्र

उपरोक्त विषया संबधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केले शासनाकडील संदर्भाधीन पत्र कृपया अवलोकन करावे.

या बाबत कळविण्यात येते की, खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्या बाबत शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदी ला अपवाद करून खाली नमूद केलेल्या संस्थेला तीच्या नांवासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून १९८९ पासून इयत्ता १ ली ते सन १९८९ - ९० या शैक्षणिक वर्षात प्रत्येक्ष सुरू असलेल्या वर्गासह प्राथमिक शाळा सुरू करण्यास खाली नमुद केलेल्या अटींची पूर्तता करण्याचा शर्ती वर विनाअनुदान तत्वावर " खास बाब" म्हणून परवानगी देण्यात येत आहे. तसेच इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|
| समतानगर गाडे चालक महासंघ येरवडा, पुणे. | येरवडा पुणे-६ | १ ली ते सन १९८९-९० या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष सुरू असलेल्या वर्गासह | मराठी |

१. संस्था सदर शाळा विनाअनुदान तत्वावर चालविण्यास आर्थिक दृष्टया सक्षम असली पाहिजे.

२. संस्थेने शाळेसाठी शासनाने विहित केलेल्या नियमानुसार आणि मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ मध्ये विहित केलेल्या अटीनुसार जागा, शैक्षणिक साहित्य आणि इतर सुविधाचे सोय केली पाहिजे तसेच शाळेसाठी विहित केलेल्या नियमानुसार विहित वयोमर्यादित व प्रशिक्षित शिक्षक वर्ग नेमला पाहिजे व त्यांना शासनाने विहित केलेल्या दरानेच वेतन व भत्ते दिले पाहिजेत.

[ पान २ वर]

३. संस्थने शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाची उदा. वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या, विद्यार्थ्यांचे प्रवेश इत्यादी काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

४. संस्थेने जवळपासच्या शाळेवर आपल्या शाळेमुळे कोणतेही दुष्परीणाम होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे.

५. ही परवानगी देण्यापूर्वी संस्थे बाबत खाली नमुद केलेल्या बाबींची खात्री करुन घेऊन मगच त्या संस्थेला खाजगी शाळेची परवानगी देण्या बाबत कार्यवाही करण्यात यावी.

१. संबधीत संस्था, संस्था नोंदणी अधीनियम १८६० व महाराष्ट्र विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणी कृत असावी किंवा केवळ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

२. संस्थेविरुद्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

३. सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळापैकी एखाद्या शाळेचे मान्यता काढून घेतलेली नाही.

४. संबधीत संस्थेत कोणत्याही प्रकारच्या गैर व्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत; अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

६. संस्थेने विहित नमुन्यात सशुल्क अर्ज केला आहे. [यापूर्वी अर्ज केला नसल्यास करुन घ्यावा.]

७. शासनाची मंजूरी नसताना प्राथमिक शाळा चालु ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रुपये १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

तरी या बाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरीत या कार्यालयास पाठवावा.

सही/

शिक्षण उपसंचालक.
पुणे विभाग, पुणे-१

प्रत:-

प्रशासन अधिकारी/महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ
जिल्हा - ---- यांना माहिती व पुढील कार्यवाही साठी.

प्रत:- मा.सचिव ---अमना नगर गाडीधारक महासंघ
---येरवडा पुणे-६-----------------
यांना माहितीसाठी अग्रेषित. सत्य प्रत.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे १ करिता